N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): रायगड **P.S.**(ठाणे): अलीबाग **Year** (वर्ष): 2021

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0007 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 30/01/2021 10:50 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार

**Time Period** (कालावधी): पहर 6

**Date From** (दिनांक पासून): 29/01/2021

**Date To** ( दिनांक पर्यंत): 29/01/2021

**Time From** (वेळेपासून): 16:00 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 16:15 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 30/01/2021 **Time** (वेळ): 04:09 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ :

**Entry No.** (नोंद क्र.): 005 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 30/01/2021 04:09 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): जिल्हापरिषद कार्यारायगड अलिबाग, अलिबाग ;अलिबाग, 402201

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव): अलीबाग

**District(State)** (जिल्हा(राज्य)): रायगड(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): उमेश बाबुराव इंगोले

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : बाबुराव इंगोले

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जवळा शहापूर, , ताचांदुरबाजार, जिल्हा-अमरावती,चांदुर बाजार,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | प्राथमीक शिक्षक, पंचायत समिती , ता नेर, जिल्हा-यवतमाळ,नेर परसोपंत,यवतमाळ,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9082415122

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नवनाथ महादू साबळे | | वडील का नाम : महादू साबळे | 1. बी-602, सेक्टर 18,सिल्व्हर स्टार सोसायटी,,सहावा मजला गोकुळ डेअरी जवळ,,कामोठे, नवी मुंबई ,अलीबाग, रायगड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अलिबाग पोलीस ठाणे दखलपात्र गु.रजि.नं. 07/2021 भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणेफिर्यादी-उमेश बाबुराव इंगोले, वय-33, वर्षे, व्यवसाय- प्राथमीक शिक्षक, पंचायत समिती नेर, ता. नेर, जिल्हा-यवतमाळ, मुळ रा. मु.पो. जवळा शहापूर, ता.चांदुरबाजार, जिल्हा-अमरावती, पिन कोड नं.444801, ( मोबाईल नंबर-9082415122)आरोपी- नवनाथ महादू साबळे, वय 47 वर्षे, वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती पनवेल, अतिरीक्त कार्यभार गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती पनवेल, (वर्ग-3) रा.बी-602, सिल्व्हर स्टार सोसायटी, सेक्टर 18, सहावा मजला गोकुळ डेअरी जवळ, कामोठे, नवी मुंबई घ.ता.वेळ व ठिकाण- दिनांक 29/01/2021 रोजी 16.00 वाजता जिल्हा परिषद रायगड अलिबाग कार्यालयातील पहील्या मजल्यावरील अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात, ता. अलिबाग, जि.रायगड येथे. अलिबाग पोलीस ठाणे दखलपात्र गु.रजि.नं. 07/2021 भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्यादी-उमेश बाबुराव इंगोले, वय-33, वर्षे, व्यवसाय- प्राथमीक शिक्षक, पंचायत समिती नेर, ता. नेर, जिल्हा-यवतमाळ, मुळ रा. मु.पो. जवळा शहापूर, ता.चांदुरबाजार, जिल्हा-अमरावती, पिन कोड नं.444801, ( मोबाईल नंबर-9082415122)
आरोपी- नवनाथ महादू साबळे, वय 47 वर्षे, वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती पनवेल, अतिरीक्त कार्यभार गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती पनवेल, (वर्ग-3) रा.बी-602, सिल्व्हर स्टार सोसायटी, सेक्टर 18, सहावा मजला गोकुळ डेअरी जवळ, कामोठे, नवी मुंबई
घ.ता.वेळ व ठिकाण- दिनांक 29/01/2021 रोजी 16.00 वाजता जिल्हा परिषद रायगड अलिबाग कार्यालयातील पहील्या मजल्यावरील अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात, ता.अलिबाग, जि.रायगड येथे.
हकिगत- व रील नुद ता.वेळी व ठिकाणी यांतील आरोपी यांनी तक्रारदार यांचे सेवापुस्तक व अंतिम देयत प्रमाणपत्र देण्याकरिता 10,000/- रूपयांची मागणी करून बेकायदेशीरपणे स्वत: चा आर्थिक फायदा करून घेणेरिता पदाचा गैरवापर करून वर नमुद तक्रारदार यांचे कडून लाचेची रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा...

मी उमेश बाबुराव इंगोले, वय- 33, वर्षे, व्यवसाय- प्राथमीक शिक्षक, पंचायत समिती नेर, ता. नेर, जिल्हा-यवतमाळ, मुळ रा. मु.पो. जवळा शहापूर, ता.चांदुरबाजार, जिल्हा-अमरावती, पिन कोड नं.444801, ( मोबाईल नंबर-9082415122) तक्रार लिहून देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहतो. मी दिनांक. 21/12/2010 रोजी रायगड जिल्हा परिषद येथे प्राथमीक शिक्षक म्हणून रूजू

झालो होतो त्यावेळी माझी प्रथम नेमणुक श्रीवर्धन पंचायत समिती अंतर्गत झाली होती व त्यानंतर दिनांक. 03/05/2019 रोजी माझी पंचायत समिती पनवेल शाळा नेरे, येथे ऑनलाईन बदली झाली व मी तेथे कार्यरत होतो. त्यानंतर मी केलेल्या विनंती अर्जावरून माझी रायगड जिल्हा परिषद येथून जिल्हा परिषद यवतमाळ येथे ऑनलाईन अंतर जिल्हा बदली झाली होती. त्यामुळे मी दिनांक.08/12/2020 रोजी माझा कार्यमुक्ती आदेश घेण्याकरीता पंचायत समिती पनवेल येथे गेलो होतो. तेथे गट शिक्षण अधिकारी श्री. नवनाथ साबळे यांनी मला कार्यमुक्ती आदेश काढण्याकरीता 25000/-रूपयांची मागणी केली होती. माझी त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल श्री. तटगुरे साहेब यांची समक्ष भेट घेवून वरील सर्व प्रकार सांगितला होता. त्यावरून तटगुरे साहेब यांनी माझी तक्रार ऐकून श्री. साबळे यांना मला कार्यमुक्त करण्याबाबत सुचना दिल्या, त्यानुसार श्री. साबळे यांनी मला दिनांक.08/12/2020 रोजी सायंकाळी यवतमाळ जिल्हा परिषदेला रूजू होण्याकरीता कार्यमुक्तीचे आदेश दिले. त्यावेळी श्री. साबळे यांनी मला, तुमचे सेवा पुस्तक आणि अखेर पेमेंन्ट स्लीप (एल.पी.सी.) नंतर पाठवू असे सांगितले होते. त्यानंतर मी दिनांक. 09/12/2020 रोजी यवतमाळ जिल्हा परिषद येथे हजर झालो.

हजर होवून 1 महीना होवून देखील माझे सेवा पुस्तक व एल.पी.सी.न पाठविल्याने आमच्या पंचायत समिती नेर येथील गट शिक्षण अधिकारी यांचे कडील एल.पी.सी. व सेवा पुस्तक मिळणे बाबतचे पत्र घेवून मी दि.25/01/2021 रोजी पंचायत समिती पनवेल कार्यालय येथे अर्ज दिला व त्याची पोहोच घेतली. त्या कामाचे अनुषंगाने मी श्री. साबळे साहेब यांची भेट घेण्यासाठी गेलो असता ते कार्यालयात हजर नसल्याने कार्यालयातील महिला क्लार्क श्रीमती खंडागळे यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी मला श्री. साबळे साहेब हे आज कार्यालयात येणार नसून तुम्ही दिनांक. 27/01/2021 रोजी समक्ष कार्यालयात येवून साबळे साहेबांना भेटून तुमचे काम करून घ्या असे सांगितले. त्यावरून मी दि. 27/01/2021 रोजी श्री. साबळे साहेब यांची समक्ष भेट घेतली असता त्यांनी मला सांगितले की, तुम्हाला कार्यमुक्त करतेवेळी सांगितल्या प्रमाणे तु काहीही पैसे दिले नाहीस, आता काहीतरी रक्कम दिल्याशिवाय तुझे सेवा पुस्तक व एल.पी.सी.चे काम करून देणार नाही असे सांगितले. त्यावरून माझी खात्री झाली की, श्री. साबळे साहेब यांना पैसे दिल्याशिवाय ते माझे सेवा पुस्तक व एल.पी.सी.चे काम करणार नाहीत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी अॅसीबी अलिबाग कार्यालयात फोनद्वारे वरील प्रमाणे लाच मागणीची तक्रार केली. त्यावेळी पो. नि.साळे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी अॅन्टी करप्शन ब्यूरो कार्यालय अलिबाग येथे हजर होवून स्वहस्ताक्षरात माझेकडे श्री. साबळे साहेब हे सेवापुस्तक व एल.पी.सी.चे काम करून देण्यासाठी लाचेची मागणी करीत असले बाबत त्यांचे विरूध्द तक्रार लिहून दिली आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. साळे यांनी मला सांगितले की मी दिलेल्या तक्रारीची दिनांक. 28/01/2021 रोजी दोन पंचा समक्ष पडताळणी करण्यात येणार असून पडताळणी व सापाळा कारवाइ बाबतची सर्व माहिती देवून योग्य त्या सुचना दिल्या व मला दिनांक. 28/01/2021 रोजी सकाळी 10-00 वाजता पनवेल येथील कर्नाळा स्पोर्टस अॅकेडमी समोर थांबून रहाण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी दिनांक. 28/01/2021 रोजी सकाळी 10-45 वाजताचे सुमारास कर्नाळा स्पोर्ट्स अॅकेडमी येथे हजर झालो. त्यावेळी तेथे पो.नि. साळे हे त्यांचे पथकासह शासकीय जिपने सदर ठिकाणी हजर होते. त्यावेळी मी पो.नि.साळे यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी त्यांचे सोबत उपस्थीत असलेल्या पंच साक्षिदार 1) श्री.शशांक पद्माकर केणी, कनिष्ठ लिपीक, आरटीओ पनवेल, 2) श्री. सोमनाथ दिगंबर गोरे, कनिष्ठ लिपीक, आरटीओ पनवेल तसेच पथकातील अंमलदार यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. साळे यांचे सुचनेवरून मी माझे तक्रारीची तोंडी हकिगत दोन्ही पंचांना सांगितली. त्यानंतर साळे साहेबांनी माझी दिनांक 27/01/2021 रोजी नोंदविलीली तक्रार दोन्ही पंचांस वाचावयास दिली. ती त्यांनी वाचून पाहीली. मी तक्रारीची तोंडी सांगितलेली हकिगत व लेखी स्वरूपात नोंदविलेली तक्रार सारखीच असल्याची खात्री झाल्यावर दोन्ही पंचांनी श्री. साळे साहेबांच्या सूचनेप्रमाणे त्या तक्रारीवर सहया केल्या.

त्यानंतर पो.नि.साळे साहेब यांनी तक्रारीचे अनुषंगाने करावयाच्या कारवाइबाबत माहिती सांगून योग्य त्या सूचना दिल्या. त्यानंतर पो.नि.साळे साहेब यांच्या सुचनेनुसार पथकातील कर्मचारी यांनी त्यांचेकडील एक डिजिटल व्हाइस रेकॉर्डर मशीन दाखवून त्याबाबत मला व पंचांना माहिती देवून त्या रेकॉर्डमध्ये एक नवीन मेमरीकार्ड टाकून मेमरीकार्ड मध्ये अगर रेकॉर्डरच्या इनबिल्ट मेमरी मध्ये कोणतीही यापुर्वीचा आवाज अगर संभाषण नसल्याची खात्री करून देवून सदर व्हाइस रेकॉर्डरवर माझे व दोन्ही पंच यांचे 11-40 वाजता वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून घेतले.

त्यानंतर पो.नि.साळे साहेब यांचे सुचने प्रमाणे पडताळणी पथकातील अंमलदार सुरज पाटील यांनी व्हाइस रेकॉर्डर सुरू करून देवुन तो माझे शर्टचे समोरील खिशात कोणास दिसणार नाही अशा प्रकारे ठेवून दिला. त्यानंतर पंच श्री. शशांक केणी यांचे सोबत माझे मोटारसायकलने मी पंचायत समिती कार्यालय पनवेल येथे जावून लोकसेवक श्री.साबळे यांची समक्ष भेट घेवून त्यांचेशी माझे सेवापट व एल.पी.सी देणे बाबतचे कामा संबधाने चर्चा केली. त्यावेळी श्री. साबळे यांनी मला मला सांगितले की, "तुमचे काम करून देतो, तुमचे इच्छेप्रमाणे करा... तुमचे इच्छेप्रमाणे दया... मी काही बोलणार नाही... तुम्ही काय वाटेल ते दया" असे बोलून लाचेची मागणी करू लागले त्यावर मी त्यांना वारंवार किती दयावे लागतील, तुम्ही सांगा असे विचारले परंतु त्यांनी प्रत्येक वेळेस तुमचे इच्छेप्रमाणे दया असे बोलून मी आता अलिबागला मिटींगला जात आहे, मी संध्याकाळी परत कार्यालयात येणार आहे, तुम्ही संध्याकाळी सहा ते साडेसहा वाजता पुन्हा कार्यालयात भेटायला या असे सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच पुन्हा माझेकडील मोटार सायकलने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी म्हणजेच पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील हॉटेल कोकण फुड व बार समोरील रोडलगत परत आलो. तेथे पो.नि. साळे यांनी मला व पंचांना घडलेली हकिगत विचारून व रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेली रेकॉर्डींग ऐकून त्यामध्ये स्पष्ट लाचेची मागणी नसल्याने पुन्हा पंच साक्षिदार यांचेसह लगेच पंचायत समिती कार्यालयात जावून श्री. साबळे यांची भेट घेवून लाचेचे रकमे बाबत पुन्हा बोलणी करून येणे बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर पो.नि.साळे साहेब यांचे सुचने प्रमाणे पडताळणी पथकातील अंमलदार सुरज पाटील यांनी व्हाइस रेकॉर्डर सुरू करून देवुन तो माझे शर्टचे समोरील खिशात कोणास दिसणार नाही अशा प्रकारे ठेवून दिला. त्यानंतर पंच श्री. शशांक केणी यांचे सोबत माझे मोटारसायकलने मी पंचायत समिती कार्यालय पनवेल येथे जावून लोकसेवक श्री.साबळे यांची समक्ष भेट घेण्यासाठी गेलो असता श्री. साबळे हे मिटींग कामी अलिबाग येथे निघून गेले असल्याचे मला समजल्याने मी व पंच पुन्हा माझे मोटार सायकलने पडताळणी पथक थांबल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर पो.नि. साळे यांनी माझे सोबत व पंचांबरोबर चर्चा करून श्री. साबळे यांचेशी मोबाइल फोनद्वारे संपर्क साधून स्पष्ट पडताळणी करण्याचे ठरविले व जेव्हा श्री. साबळे यांचेशी मोबाइलवर संभाषण होइल त्यावेळी मोबाइलवरील संभाषण ध्वनिमुद्रीत केले जाइल अशा सुचना दिल्या व त्याप्रमाणे मला श्री. साबळे यांना माझे मोबाइल फोन वरून दोन वेळा श्री. साबळे यांना कॉल केला परंतु त्यांनी कॉल रिसीव्ह केला नाही. म्हणून मी, पंच व सापळा पथक असे सर्वजण सायंकाळी साडे सात वाजेपर्यंत तेथेच थांबून श्री. साबळे यांचे फोनची वाट पाहीली परंतु त्यांचा फोन न आल्याने पुन्हा त्यांना फोन करून मी कार्यालयाजवळ थांबलो आहे असे सांगितले, त्यावर त्यांनी मी एक तासात कार्यालयाजवळ येतो तुम्ही कार्यालयात येवून भेटा असे श्री. साबळे यांनी मला सांगितले. सदरचा कॉल व्हाइस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

त्यानंतर पो.नि.साळे साहेब यांचे सुचने प्रमाणे 20-36 वाजताचे सुमारास पडताळणी पथकातील अंमलदार सुरज पाटील यांनी व्हाइस रेकॉर्डर सुरू करून देवुन तो माझे शर्टचे समोरील खिशात कोणास दिसणार नाही अशा प्रकारे ठेवून दिला. त्यानंतर पंच श्री. शशांक केणी यांचे



पोलीस निरीक्षक अलिबाग सत्यमेव जयते रायगड

सोबत माझे मोटारसायकलने मी पंचायत समिती कार्यालय पनवेल येथे जावून थांबून राहीलो. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक श्री.साबळे हे त्यांचे वाहनाने कार्यालयाजवळ आले व कार्यालयाचे समोरील रोडवर मोकळया जागेत मी त्यांची समक्ष भेट घेतली सदर भेटीचे वेळी संभाषणा दरम्यान मी त्यांना किती रूपये देवू याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला "टेन... टेनच कर.." असे बोलले असता मी त्यांना दहा हजार रूपये का? अशी खात्री केली असता त्यांनी "हो...हो..,उदया सकाळी साडेआठ वाजता कार्यालयात या मी तुमचे काम करून देतो " असे बोलून दहा हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी पंच साक्षिदार यांचेसह माझे मोटार सायकलने पडताळणी पथक थांबल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर पो.नि.श्री. साळे यांनी मला व पंचांस घडलेली हकिगत विचारली तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण सर्वासमक्ष ऐकले व श्री. साबळे यांनी माझेकडून लाचेची स्पष्ट मागणी केल्याची खात्री झाल्याने उदयीक दिनांक. 29/01/2021 रोजी पंचायत समीती पनवेल कार्यालय येथे सापळा कारवाई करण्याचे ठरविले व सर्वांना योग्य त्या सुचना देवून मला लाचेचे रकमेसह सकाळी पुन्हा 08-00 वाजता पनवेल येथे पंचमुखी हनुमान मंदिरा जवळ येण्याच्या सुचना दिल्या.

पो.नि.श्री. साळे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी दिनांक. 29/01/2021 रोजी 08-30 वाजण्याचे सुमारास पनवेल येथे पंचमुखी हनुमान मंदिरा जवळ आलो त्यावेळी तेथे पो.नि. साळे हे पंच साक्षिदार व त्यांचे पथकासह तेथे हजर होते.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.साळे साहेब यांनी श्री. साबळे यांचेविरूध्द सापळा कारवाई करण्याचे ठरवुन त्याअनुषंगाने करावयाची सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई समजावून सांगीतली. त्यानंतर पो.नि.श्री. साळे साहेब यांनी आम्हाला सुचना देवून माझेकडुन नियोजीत सापळयाची रक्कम म्हणून 10,000/- रू. 500 रूपये दराच्या 20 नोटा असे त्यांचे ताब्यात घेतले. त्यानंतर लाचेच्या रकमेच्या नोटांचे नंबर नोंदवून घेण्यात आले. त्यानंतर पो.नि. साळे यांनी शासकीय जिपमध्ये मला व दोन्ही पंच यांना अॅन्थ्रासीन पावडर दाखवून पावडरचे गुणधर्म पथकातील मपोना/स्वप्नाली पाटील यांनी समजावून सांगीतले. त्याप्रमाणे पावडरचे साध्या प्रकाशात व अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यानंतर मी दिलेल्या 10,000/- रूपयांच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून त्यांनी ती लाचेची रक्कमेची घडी करून माझे पॅन्टचे डावे खिशात ठेवली. त्यानंतर पोनि.साळे यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सूचना दिल्या. त्यानंतर माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतले. अशा रितीने माझे व पंचांसमक्ष सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई पनवेल येथे पंचमुखी हनुमान मंदिरा जवळ शासकीय जिपमध्ये पुर्ण केलेली आहे.

त्यानंतर पो.नि.श्री. साळे यांचे सुचनेप्रमाणे मी लोकसेवक श्री. साबळे यांना माझे मोबाईलवरून त्यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी मला सांगितले की, " लोकसेवक साबळे यांनी सांगितले की, त्यांची अलिबाग येथे जिल्हा परिषदला मिटींग असल्याने ते अलिबागकडे जात आहेत तक्रारदार यांचे सेवापट आणि लास्ट पे सर्टिफीकेट तयार केले असून पंचायत समिती पनवेल कार्यालयातून श्रीमती खंडागळे मॅडम यांच्याकडून घेवून ते अलिबाग येथे घेवून या. खंडागळे मॅडमना फोन करून कागदपत्र देणेसाठी सांगून ठेवतो, असे बोलून जिल्हा परिषद अलिबाग येथे त्यावर सहया करून देतो. असे सांगितले" असे सांगितले.. सदरचे संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर पो.नि. साळे यांनी माझेबरोबर व पंचांबरोबर चर्चा करून सापळा कारवाई अलिबाग येथे करण्याचे ठरविले व मला पंचायत समिती पनवेल कार्यालयात जावून माझे प्रकरण ताब्यात घेवून येण्यास सांगितले, त्याप्रमाणे मी पंच श्री. केणी यांचेसह माझे मोटार सायकलने पंचायत समिती कार्यालय पनवेल येथे जावून श्रीमती खंडागळे यांचेकडे जावून माझे तयार करून ठेवलेले सेवा पुस्तक, एल.पी.सी. सोबत घेवून पुन्हा सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो.

त्यानंतर पो.नि.श्री. साळे यांचे सुचनेप्रमाणे मपोना/स्वप्नाली पाटील यांना सापळा पथकातुन वगळून एस.टी.बसने अलिबाग येथे अॅन्टी करप्शन ब्यूरो कार्यालयात जावून थांबून रहाण्याच्या सुचना दिल्या व मी, पंच साक्षिदार व सापळा पथक असे शासकीय जिपने पनवेल येथून निघून अलिबाग येथे जिल्हा परिषद कार्यालयापुढील क्रिडाभवन मैदान येथे आलो. त्यानंतर 11.40 वाजता पो.नि. श्री. साळे यांचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईलवरून लोकसेवक श्री. साबळे यांना फोन करून मी जिल्हा परिषद कार्यालयाजवळ आलो आहे असे सांगितले असता त्यांनी मला सांगितले की, " माझी जिल्हा परिषद येथे सीईओ यांचेकडे मिटींग चालु आहे मिटींग संपल्यानंतर मी तुम्हाला एक तासानी फोन करतो तेथे तुम्ही या तेथे मी कागदपत्रांवर सहया करतो." सदरचे संभाषण व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर मी दोन तास थांबून पो.नि. साळे यांचे सुचनेप्रमाणे लोकसेवक श्री. साबळे यांना त्यांचे मोबाईलवर थोडया थोडया वेळाने तीन वेळा फोन केला असता त्यांनी फोन रिसिव्ह केला नाही.

त्यानंतर लोकसेवक श्री. साबळे यांचा सुमारे 15.45 वा. माझे मोबाईलवर फोन आला त्यावेळी लोससेवक श्री. साबळे यांनी माला सांगितले की, " जिल्हा परिषदेच्या पहिल्या मजल्यावर येण्याबाबत सांगून फोन बंद केला " असे फोनवर सांगितले. सदरचा फोन ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

त्यानंतर पो.नि. साळे यांनी पंच साक्षिदार, मला व सापळा पथकातील कर्मचारी यांना योग्य त्या सुचना दिल्या त्यानंतर पो.नि.श्री. साळे यांचे सुचनेवरून मी पंच साक्षिदार यांचे समक्ष माझे पॅन्टचे डावे खिशात ठेवलेले लाचेचे रकमेची खात्री केली व त्यांनतर 15.48 पोना/सुरज पाटील यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करून देवुन तो माझे शर्टचे समोरील डावे खिशात कोणास दिसणार नाही अशा प्रकारे ठेवून दिला. त्यानंतर मला व पंच श्री.केणी यांचेसह पायी लोकसेवक श्री.साबळे हे थांबले असलेल्या ठिकाणी जिल्हा परिषद कार्यालयाकडे कागदपत्रांसह जाण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी व पंच श्री. केणी हे असे आम्ही पायी चालत जिल्हा परिषद कार्यालयाकडे निघालो व पहील्या मजल्यावरील मोकळया पॅसेजमध्ये आलो व आमचे पाठोपाठ पो.नि. श्री. साळे, पंच नं.2 व सापळा पथकातील कर्मचारी असे पायी चालत तेथे आले. त्यावेळी मला लोकसेवक श्री. साबळे यांचा फोन आला व त्यांनी मला लवकर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात बोलाविले. मी मोकळ्या पॅसेजमधून जात असताना अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा कक्ष शोधत जात असताना लोकसेवक श्री. साबळे यांनी सदर कक्षाचे दरवाजात उभे राहून हाताचे इशा-याने मला कक्षात बोलाविले. कक्षात गेल्यानंतर " त्यांनी मला विचारले डॉक्युमेंट आणले का? तेव्हा मी माझेबॅग मधील पंचायत समिती पनवेल येथून आणलेले कागदपत्र काढून त्यांच्याकडे दिले. त्यावर लोकसेवक साबळे यांनी सहया करून ती सर्व कागदपत्रे माझे कडे दिली. तसेच पंचायत समितीला फोन करून सदर कागदपत्रे जावक करून देतो असे त्यांनी मला सांगितले. त्यानंतर मी सदरची कागदपत्रे माझे बॅगमध्ये ठेवली. त्यानंतर लोकसेवक साबळे यांनी उजव्या हाताची तर्जनी अंगठयावर घासून लाचेच्या रक्कमेची मागणी केली. तेव्हा मी माझे पॅन्टचे डावे खिशातील लाचेची रक्कमेची घडी काढून लोकसेवक यांच्या समोर धरली व त्यांना दहा हजार रूपये आहेत साहेब असे सांगितले. त्यांनी सदरची लाचेची रक्कम डावे हाताने स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यांनतर मी केबिन चे बाहेर व-हांडयात येवून सापळा पथकास दिसेल असा लोकसेवक साबळे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला" त्याचवेळी पोना/ सुरज पाटील यांनी माझे जवळ येवून माझेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केला व मला पोनि साळे यांनी लाचेची रक्कम कोणी घेतली व कोठे ठेवली या बाबत विचारणा करून मला मोकळ्या पॅसेजमध्ये बाजूस थांबण्यास सांगितले त्यावेळी पंच क्र.2 व सापळा पथक हे कक्षाचे आत मध्ये जावून श्री. साबळे यांना रंगेहात पकडले.

त्यानंतर थोडया वेळाने पो.नि.साळे यांनी मला कक्षामध्ये बालावून घेवून त्यांच्या कर्मचा-यामार्फत माझी अल्ट्रांव्हाऱ्इलेट बॅटरीचे प्रकाशात तपासणी केली व माझेकडे आल्यानंतर मला साळे साहेबांनी पुढील कारवाऱ्इ करीता लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय पिंपळभाट, अलिबाग येथे जाण्याचे आहे असे सांगून लोकसेवक श्री. साबळे, पंच व सापळा पथकातील कर्मचारी असे आम्ही सर्व शासकीय जिपने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय पिंपळभाट, अलिबाग येथे आलो. त्या ठिकाणी पंचनामा टंकलिखीत करणार असलेबाबत श्री.साळे यांनी मला सांगीतले. तसेच मला घडलेली हकिगत विचारली असता मी घडल्या प्रमाणे सविस्तर हकिगत श्री.साळे साहेब यांना सांगितली.

अशारितीने नवनाथ महादू साबळे, वय 47 वर्षे, वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती पनवेल, अतिरीक्त कार्यभार गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती पनवेल, (वर्ग-3) रा.बी-602, सिल्व्हर स्टार सोसायटी, सेक्टर 18, सहावा मजला गोकुळ डेअरी जवळ, कामोठे, नवी मुंबऱ्इ यांनी माझेकडे माझे सेवापुस्तक व अंतिम वेतन दाखला देण्याकरीता दिनांक 28/01/2021 रोजी पंच साक्षीदार यांच्या समक्ष 10,000/- रूपये लाचेची मागणी करून दिनांक 29/01/2021 रोजी 16.00 वाजता 10,000/- लाचेची रक्कम जिल्हा परिषद रायगड अलिबाग कार्यालयातील पहील्या मजल्यावरील अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारताना त्यांना पकडण्यात आले आहे. म्हणुन माझी नवनाथ महादू साबळे, वय 47 वर्षे, वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती पनवेल, अतिरीक्त कार्यभार गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती पनवेल, यांचे विरूध्द फिर्याद आहे.

तरि वरिष्टांचे आदेशाने पूढील तपास पोनि/किशोर साळे, पोलीस निरिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग हे करित आहेत

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Kerubhau Dattatray Kolhe(I (Inspector)) / POBN67105 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

ठाणे अंमलदार
अलिबाग पोलीस ठाणे

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Kerubhau Dattatray Kolhe
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN67105

पोलीस निरीक्षक अलिबाग
सत्यमेव जयते
रायगड

प्रत मिळाली

श्री. ओशंबा. ढेंगोले

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)